**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०११ मधील</u>**

**<u>निशाण १११ खालील आदेश</u>**

**<u>CNR No. MHRT050004592011</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांचेविरूध्द झालेला 'युक्तीवाद नाही' चा आदेश रद्द करण्याकरिता दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे प्रस्तुत वादी यांनी नि.७ कडे नवीन वकील नेमणेकरिता व युक्तीवादाकरिता मुदतीचा अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज हा न्यायालयाने नामंजुर केला व वादीविरूध्द युक्तीवाद नाहीचा आदेश पारित केला आहे. वादी हे अशिक्षित असुन त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. वकीलांनी दिलेल्या अपुर्ण माहितीमुळे युक्तीवाद करणे शक्य झाले नाही. सदरचा दावा हा महत्वाचा असुन त्यातील खरी वस्तुस्थिती न्यायालयासमोर युक्तीवाद करणे गरजेचे आहे. न्यायालयाने युक्तीवाद करणेची संधी न दिल्यास वादी यांची परिमित कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे. तरी वादीविरूध्द झालेला 'युक्तीवाद नाही' चा आदेश रद्द करून त्यांना युक्तीवाद करणेची संधी देण्यात यावी अशी विनंती त्यांनी प्रस्तुत अर्जाव्दारे केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वादी यांनी आतापर्यंत तीन वकील बदलेले आहेत. सदर प्रकरणातील पुरावा संपुण अनेक तारख झालेल्या आहेत. केवळ निकाल लवकर होवुन नये म्हणुन वादी युक्तीवाद करत नाहीत. अशा परिस्थितीत केवळ वेळ काढुपणा चालला असल्याने व अनेकवेळा संधी देवुनही वादी युक्तीवाद करत नाहीत. परंतु न्यायाचे कारणास्तव वादीने आता नवीन वकील दिल्यामुळे जास्तीत जास्त कॉस्ट करून शेवटची संधी द्यावी असे म्हटले आहे.

५. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला. दोन्ही बाजूंकडील वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा वादी यांनी कब्जा, आदेशात्मक तसेच निरंतर ताकीदीकरिता दाखल केला आहे. त्यास प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केला आहे. सदर प्रकरणी दि.०९/०३/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी पुरावा बंद केला आहे. तदनंतर सदरचे प्रकरण हे युक्तीवादावर लागले आहे. वादी यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये वेळोवेळी वकील बदलले आहेत तसेच वादी यांना दि.२८/११/२०२३ पर्यंत युक्तीवादाकरिता मुदत देण्यात आली होती. तरीही त्यांनी दि.२८/११/२०२३ अखेर युक्तीवाद केला नसल्याने त्यांचेविरूध्द युक्तीवाद नाहीचा आदेश पारित केला आहे. सदरचा आदेश प्रस्तुत अर्जाव्दारे त्यांनी रद्द करून मागितला आहे. प्रस्तुत वादी यांना

अंतिम युक्तीवाद करण्यास संधी न दिल्यास त्यांची बाजु पटलावर येणार नाही. त्यामुळे त्यांचे पैशाने भरून न येणारे असे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. दावा, प्रतिदावा, त्यातील मागणीचे स्वरूप पाहता दावा व प्रतिदाव्याच्या नैसर्गिक निर्गतीकरिता प्रस्तुत वादी यांना युक्तीवादाची संधी देणे न्यायोचित ठरेल परंतु वादी यांनी युक्तीवाद केला नसल्याने सदरचे काम प्रलंबित राहिले त्यामुळे त्यांना यथोचित कॉस्ट करणे उचित ठरेल असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.१११) हा रक्कम रू.५००/– इतकी कॉस्ट प्रतिवादी क्र. १ यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना रक्कम रू.५०० /– ही दिल्यानंतर त्यांचेविरूध्द झालेला युक्तीवाद नाहीचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. वादी यांनी पुढील तारखेस कोणतीही सबब सांगता युक्तीवाद करणेचा आहे.

सही/-

दिनांकः २९/०६/२०२४

**(मनिषा एम. पाटील)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी

CERTIFICATE

I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Clerk | : | Shri. C. S. Adulkar |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 29/06/2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 29/06/2024 |
| Order uploaded on | : | 05/07/2024 |